77
6

D:\Bilaye 24.06.2016\77 order.docx

# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, उरण

## यांचे कार्यालय


बापदेव मंदिराशेजारी, उरण बोरी, ता. उरण जि. रायगड

फोन नं. 02227220345

ईमेल - arcsuranraigad@gmail.com


20 जा.क्र. सनिउ/सअर/क७७अ/श्रीराम/हौ/सन १८

दिनांक:- ०१/०१/२०१८.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये आदेश.**

**वाचावे :-** १. श्री. आर.आर. बिलये, प्राधिकृत अधिकारी यांचा दिनांक /१०/२०१७ रोजीचा अहवाल.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुद.

ज्याअर्थी, श्रीराम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चाणजे, आनंद नगर, उरण ता. उरण जि. रायगड ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून तीचा नोंदणी क्रमांक आरजीडी/युआरएन/एचएसजी/टीसी/७७३/२००५-२००६ असा असून ती या कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येते आणि,

ज्याअर्थी संस्थेची दिनांक ०८/१०/२०१७ रोजी श्री. आर. आर. बिलये, प्राधिकृत अधिकारी यांनी सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीसाठी व्यवस्थापक समितीची निवडणूक घेवून पदाधिकारी निवडीबाबत निवडून आलेल्या सदस्यांपैकी कोणीही सदस्य ईच्छुक नसल्याचे संदर्भ क्रमांक १ अन्वये प्राधिकृत अधिकारी यांनी कळविले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्था चालविण्यांस कुठल्याही सदस्याना स्वारस्य राहीलेले नसल्याने संस्थेवर अधिकृत व्यवस्थापक समितीच अस्तित्वात राहीलेली नाही. सबब संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी तात्काळ प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे माझे मत झाल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील परंतुका (२) नुसार कारणे दाखवा नोटीस देण्याची आवस्यकता नाही अशी या कार्यालयाची खात्री झाली आहे. आणि,

त्याअर्थी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ अन्वये मला प्राप्त् अधिकारापरत्वे मी, संदिप ठाकूर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उरण तालुका जि. रायगड श्रीराम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चाणजे, आनंद नगर, उरण ता. उरण जि. रायगड या संस्थेची विद्यमान व्यवस्थापक समिती अल्पमतात आल्याने समिती बरखास्त् करुन श्री. आर. आर. बिलये, सहकारी अधिकारी श्रेणी 2 यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. त्यांनी संस्थेच्या दप्तराचा मालमत्तेचा व कागदपत्रांचा संपुर्ण पदभार घेऊन अहवाल या कार्यालयांस सादर करावा. तसेच दोषांची पुर्तता करुन सहा महिन्याचे आंत नवीन व्यवस्थापक समिती गठीत करुन पदभार सुपुर्त करावा.

सदरचा आदेश आज दिनांक01/01/2018 रोजी माझे सही शिक्क्यासह दिला आहे.

(संदिप ठाकूर)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, उरण तालुका

Assistant Registrar, Co-operative Societies

1) चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार/सदस्य

श्रीराम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चाणजे, आनंद नगर, उरण ता. उरण जि. रायगड

2/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा मालमत्तेचा आणि हिशोबाचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांचेकडे सुपुर्द करावा. तसेच प्राधिकृत अधिकारी यांना मानधन रु. 3500/- व प्रवास खर्च रु. 500/- असे एकूण दरमहा रु. 4000/- मात्र प्राधिकृत अधिकारी मेहनताना म्हणून मंजूर करण्यांत येत आहे. सदरचा खर्च संस्थेच्या निधीतुन भागविण्यांत यावा.

2) श्री. आर. आर. बिलये, सहकारी अधिकारी श्रेणी-2

2/- त्यांना कळविण्यांत येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा मालमत्तेचा आणि हिशोबाचा ताबा त्वरीत घेऊन अहवाल या कार्यालयांस सादर करावा.

3) शाखा व्यवस्थापक, दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. उरण शाखा

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, उरण तालुका

Received
03/02/2018

03/02/18